## " विवेकानंद शिक्षण संस्थेचे समाज उभारणीत भरीव योगदान "

**- नामदार विनोद तावडे, शिक्षण मंत्री , महाराष्ट्र राज्य**

कोल्हापूर दि. ९ : " महाराष्ट्रातील शिक्षण विस्तारीकरणाच्या काळात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी याकरीता श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली व त्यामुळेच गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळाले. त्यामुळेच महाराष्ट्राच्या समाजउभारणीस एक वेगळे वळण मिळाले. विवेकानंद शिक्षण संस्थेचे हे कार्य अभिनंदनीय आहे. आजची शिक्षण पध्दती झपाटयाने बदलत असली तरी गुणवत्तेवर व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम निर्मितीकडे लक्ष दिले पाहिजे. " असे विचार महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री नामदार विनोद तावडे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री व जिल्हयाचे पालक मंत्री मा.नामदार चंद्रकांत (दादा) पाटील हे होते.

आपल्या भाषणात शिक्षणमंत्री नामदार तावडे यांनी आजचे बदलते जागतिकीकरण व शिक्षण व्यवस्था यावर मार्मिक विवेचन केले. ते आपल्या भाषणात म्हणाले, "आज श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने अनेक शाळा कॉलेजच्या माध्यमातून समाजात शैक्षणिक क्रांती घडवली आहे. डॉ. बापूजी साळुंखेंच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने ही शिक्षणसंस्था नवे कोर्सेस व नवी शैक्षणिक धोरणे राबवून शिक्षणात नवे बदल घडवत आहे."

अध्यक्षीय भाषणात बोलताना मा. नाम. चंद्रकांत (दादा) पाटील यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वाटचालीचा व विविध उपक्रमांचा आढावा घेत ही संस्था समाजाभिमुख करत असलेल्या कार्याचा गौरव केला. डॉ. बापूजींनी शिक्षणाच्या ज्ञानसाधनेतून खेडोपाडी शाळा महाविद्यालये काढून बहुजनांच्या मुलांना शिक्षणाची संधी प्राप्त करुन दिली.आज सुमारे ४०६ ज्ञानशाखांतून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असून नोकरी व्यवसाय व विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. बापूजींनी दिलेली शैक्षणिक तत्वप्रणाली समाजासाठी आदर्शवत असून संस्काराचे पावित्र्य जपणारी ही शिक्षण संस्था आहे. त्यांनी प्रत्येक शाळा कॉलेजमध्ये व शहरामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह उभारण्याचे आश्वासनही दिले.

आपल्या मनोगतात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु मा. देवानंद शिंदे म्हणाले, बापूजीनी दुर्गम भागात केलेल्या शिक्षणाच्या सोयीमुळे माझ्यासारख्या विद्यार्थ्याला शिक्षणक्षेत्रातील सर्वोच्च पदापर्यंत जाता आले. पद्मश्री डॉ. डी.वाय.पाटील म्हणाले, डॉ. बापूजींनी माणसामधील परमेश्वर जागा केला. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे समाजाला नवी दिशा प्राप्त झाली आहे. कोल्हापूरच्या महापौर सौ. शोभाताई बोंद्रे यांनी बापूजींच्या व संस्थेच्या कार्याबद्दल गौरवोदगार काढले. मा. आय डी पाटील , प्रवर अधीक्षक, डाकघर, कोल्हापूर यांनी बापूजींच्याबद्दल आपले विचार मांडले.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे , संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी श्री महेश हिरेमठ यांनी संस्थेची प्रार्थना व भक्तिगीते सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. प्राचार्य डॉ आर व्ही शेजवळ यांनी जन्मशताब्दी महोत्सवाची भूमिका व नियोजनासंबंधी विचार मांडले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पोस्ट तिकिटाचे व पोस्ट पाकिटाचे अनावरण करण्यात आले तसेच जन्मशताब्दी वर्ष लोगोचे उद्घाटन करण्यात आले तसेच जन्मशताब्दी नियोजन पुस्तिका व दिनदर्शिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. शेवटी आभार मानताना

संस्था सचिव मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे म्हणाल्या, डॉ.बापूजींनी उभी केलेली ज्ञानभूमी जनसेवेची कर्मभूमी आहे. शिक्षणाच्या प्रसारातून उच्चतम संस्कारमूल्ये जतन करावयाची आहेत.

सकाळ सत्रात जन्मशताब्दी शुभारंभ ऐतिहासिक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये सर्व गुरुदेव कार्यकर्ते व विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी संस्था उपाध्यक्ष मा.संपतराव जेधे , सहसचिव (अर्थ) प्राचार्य आर.व्ही.शेजवळ , प्राचार्य युवराज भोसले, प्राचार्य धनराज भोसले, प्राचार्य आर आर पाटील, मा.जी.पी.काका पाटील, शाहीर कुंतीनाथ करके, प्राचार्य डॉ. एस.वाय. होनगेकर, सर्व आजीव सेवक, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

---

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

जा.क्र. २०१७-१८ दिनांक : ०९.०६.२०१८

प्रति,
मा. संपादकसो,
दैनिक ---------------------------
कोल्हापूर .

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू ,

डॉ. एस. वाय. होनगेकर

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज,
कोल्हापूर.